महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ८०८/८५ दिनांक :- २६ जून, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे दुसऱ्या जनता दरबार दिनात २७ तक्रारींवर सुनावणी

मुंबई, दि. २६ जून, २०२५ :- जनसामान्यांच्या समस्यांकडे तात्काळ लक्ष देत त्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने 'म्हाडा'च्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे आज दुसऱ्या जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले.

वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात झालेल्या या विशेष उपक्रमात, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली एकूण २७ तक्रार अर्जांवर सुनावणी करण्यात आली. श्री. शंभरकर यांनी सर्व अर्जदारांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करत अर्जदारांच्या मागण्या व प्रलंबित कामे तत्परतेने सोडविण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करत मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे आज दुसरा जनता दरबार यशस्वीपणे पार पाडला आणि शासनाच्या जनकल्याणकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचा प्रत्यय दिला.

आजच्या जनता दरबार दिनात, पुनर्विकासासाठी गेलेल्या उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरू/रहिवासी यांची नावे वगळली जाणे, विकासकाकडून भाडे न मिळणे, पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रलंबित असणे, सदनिका हस्तांतरित करतेवेळी इतर वारसांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले नसणे, वारस म्हणून नाव लावणे, म्हाडा सर्वेक्षणानंतर भाडेकरू/रहिवासी असल्याची प्रमाणित प्रत देणे आदी मुद्यांवरील तक्रारी प्राप्त झाल्या. श्री. शंभरकर यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ व योग्य कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

========================================================

Outward No. : 808/85 Dt. June 26, 2025

**Press Release**

# MHADA's Mumbai Building Repairs and Reconstruction Board holds second Janata Darbar; 27 citizen grievances addressed

Mumbai, 26 June 2025: With the objective of addressing public issues promptly and ensuring their resolution, the Mumbai Building Repairs and Reconstruction Board under MHADA today organised its second Janata Darbar.

The session was held at Bharat Ratna Gulzarilal Nanda Hall at MHADA Headquarters, Bandra (East), under the chairmanship of Mr. Milind Shambharkar, Chief Officer of the Mumbai Building Repairs and Reconstruction Board. A total of 27 grievance applications were heard during the session. Mr. Shambharkar instructed the concerned department officials to resolve the applicants' demands and pending matters immediately and efficiently.

In line with the instructions issued by Hon'ble Chief Minister Mr. Devendra Fadnavis and the guidance of Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Mr. Eknath Shinde, all regional boards under MHADA have been directed to organise Janata Darbar sessions as part of the Redressal of Citizens' Grievances component of the 100-day, seven-point action plan. These directives have been formally conveyed by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer of MHADA.

Acting promptly on this, the Mumbai Building Repairs and Reconstruction Board successfully conducted its second Janata Darbar today, reaffirming the implementation of the government's welfare-oriented policies.

The grievances raised during the session included issues such as removal of names of original tenants or residents from cess-registered buildings under redevelopment, non-receipt of rent from developers, pending no objection certificates for redevelopment, absence of NOC from other heirs during transfer of tenements, addition of names as legal heirs, and issuance of certified copies confirming tenancy or residency after MHADA surveys.

Mr. Shambharkar attentively heard each applicant and directed the respective officers to take immediate and appropriate action on all such matters.

###

(Vaishali Gadpale)

Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial













D:\Documents\Press Release\85-2025 MBRRB 2nd Janta Darbar.docx